पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११५ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल:, registrar@sus.ac.in bos@sus.ac.in



## अभ्यासमंडळे विभाग

जा.क्र.पुअहोसोविसो/अमंवि/२०२१/ 5913 दि. 12 AUG 2021

प्रति
१) मा. प्राचार्य/प्राचार्या, सर्व संलग्नित महाविद्यालये
२) मा. संचालक, विद्यापीठ परिसर सर्व शैक्षणिक संकुले
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून बी.ए. भाग-२ मराठी पाठयपुस्तक “जगायच कशासाठी ?” या पुस्तकाऐवजी “हिरव्या वाटा” हे पुस्तक अभ्यासक्रमात समाविष्ठ केलेबाबत...**

संदर्भ :- १) प्रा. डॉ. डी. आर. गायकवाड, अध्यक्ष मराठी अभ्यासमंडळ यांचे दि.१०/०६/२०२१ रोजीचे पत्र.
२) दि.१०/०७/२०२१ रोजीच्या मा. विद्यापरिषदेतील ठराव क्र. १२०.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, शै. वर्ष २०२०-२१ पासून मानविज्ञान शाखा अंतर्गत बी.ए. भाग-२ मराठी अभ्यासक्रम सुधारित करून विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला होता. मराठी अभ्यासमंडळाचे मा. अध्यक्ष यांनी संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये बी.ए.भाग-२ मराठी अभ्यासक्रमात डॉ. निर्मलकुमार फडकुले लिखित “जगायच कशासाठी?” या पाठयपुस्तकाऐवजी “हिरव्या वाटा” हे पाठयपुस्तक बी.ए. भाग-२ मराठीच्या अभ्यासक्रमात समाविष्ठ करण्याबात विद्यापीठास विनंती केली होती.

या अनुषंगाने दि.१०/०७/२०२१ रोजीच्या मा. विद्यापरिषदेच्या बैठकीमध्ये क्र.१२० नुसार विषय सादर केला असता मा. विद्यापरिषदेने सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित केला आहे.

ठराव क्र.१२० शै. वर्ष २०२१-२२ पासून बी.ए.भाग-२ मराठी पाठयपुस्तक डॉ. निर्मलकुमार फडकुले लिखित “जगायच कशासाठी?” याऐवजी “हिरव्या वाटा” हे पुस्तक अभ्यासक्रमात समाविष्ठ करण्यसाठी मानवविज्ञान विद्याशाखेने केलेली शिफारस स्विकारून सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

उपरोक्त बाब आपल्या माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव कळविण्यात येत आहे. आपण सदर बाब आपल्या अधिपत्याखालील संबंधित अध्यापक तथा विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणून द्यावी, ही विनंती. सोबत संदर्भीय ठरावाची छायांकित प्रत जोडली आहे.

आपला विश्वासू,

(प्रा. डॉ. वि. भा. घुटे)
प्र.कुलसचिव

सोबत:- वरीलप्रमाणे.

प्रत : प्रा. डॉ. डी. आर. गायकवाड, अध्यक्ष, मराठी अभ्यासमंडळ, पुअहोसोविसो.

[ १२० ] **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून बी.ए. भाग-२ मराठी पाठ्यपुस्तक डॉ. निर्मलकुमार फडकुले लिखित "जगायच कशासाठी?" याऐवजी "हिरव्या वाटा" हे पुस्तक अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यासाठी मानवविज्ञान विद्याशाखेने केलेली शिफारस विचारार्थ.**

विद्या परिषद
विषय क्रमांक (120)
दिनांक :- 10 JUL 2021

(टिपणी: शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून मानवविज्ञान विद्याशाखा अतंर्गत बी.ए. भाग-२ मराठी चा अभ्यासक्रम सुधारीत करून विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. परंतू मराठी अभ्यासमंडळाचे अध्यक्ष प्रा.डॉ.डी.आर.गायकवाड यांनी दि.१०/०६/२०२१ रोजीच्या पत्रान्वये बी.ए. भाग-२ पाठ्यपुस्तक डॉ. निर्मलकुमार फडकुले लिखित "जगायच कशासाठी?" यामध्ये अनेक मुद्रित दोष असल्याने तसेच अभ्यासक्रमातील घटकही अधिक असल्यामुळे सदर पुस्तक अभ्यासक्रमातून वगळून डॉ.निर्मलकुमार फडकुले लिखित "हिरव्या वाटा" हे पुस्तक अभ्यासक्रमात समाविष्ट करणेबाबत दि. ०४ व ०५ जून रोजी ऑनलाईन प्रणालीव्दारे संपन्न झालेल्या अभ्यासमंडळाच्या बैठकीत सर्वानुमते मान्यता देण्यात आली असल्याचे कळविले आहे.

याअनुषंगाने सदर बाब दिनांक १४/०६/२०२१ रोजी संपन्न झालेल्या मानवविज्ञान विद्याशाखेच्या बैठकीमध्ये आयत्या वेळेचा विषय म्हणून सादर केली असता बी. ए. भाग-२ मराठी पाठ्यपुस्तक डॉ. निर्मलकुमार फडकुले लिखित "जगायच कशासाठी?" याऐवजी डॉ. निर्मलकुमार फडकुले लिखित "हिरव्या वाटा" हे पुस्तक शै. वर्ष २०२१-२२ पासून लागू करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येऊन सदर बाब अंतिम मान्यतेकरिता विद्या परिषदेकडे शिफारस करण्यात आली आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून बी.ए. भाग-२ मराठी पाठ्यपुस्तक डॉ. निर्मलकुमार फडकुले लिखित "जगायच कशासाठी?" याऐवजी "हिरव्या वाटा" हे पुस्तक अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यासाठी मानवविज्ञान विद्याशाखेने केलेली शिफारस विचारार्थ).

| ठराव: | **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून बी.ए. भाग-२ मराठी पाठ्यपुस्तक डॉ. निर्मलकुमार फडकुले लिखित "जगायच कशासाठी?" याऐवजी "हिरव्या वाटा" हे पुस्तक अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यासाठी मानवविज्ञान विद्याशाखेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
|---|---|